आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

१७ सप्टेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- मणिपूरमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी आराखडा तयार केल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- अनंत चतुदर्शी निमित्त ठिकठिकाणी मिरवणुका काढत लाडक्या गणरायाला भक्तांचा निरोप

- अरविंद केजरीवाल यांचा दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा, आपच्या विधीमंडळ पक्षनेतेपदी आतिशी यांची निवड

- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उद्या २४ मतदारसंघांमध्ये मतदान

**आणि**

- आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारताला सलग पाचव्यांदा अजिंक्यपद

**<><><><><>**

मणिपूरमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी केंद्र सरकारनं आराखडा तयार केला असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातल्या तिसऱ्या कार्यकाळात केंद्र सरकारला १०० दिवस पूर्ण झाल्यानिमीत्त त्यांनी आज नवी दिल्लीत बातमीदारांशी संवाद साधला.

मणिपूरमधला हिंसाचार वांशिक स्वरुपाचा आहे, आणि तो रोखण्यासाठी सरकार कुकी आणि मैतेई या दोन्ही समुदायांसोबत चर्चा करत आहे, असं त्यांनी सांगितलं. तिथली परिस्थिती लवकरच पूर्वपदावर येईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

संरक्षण क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या कार्यकाळाचे १०० दिवस पूर्ण झाल्यानिमीत्त ते आज बातमीदारांशी बोलत होते.

**<><><><><>**

केंद्रातल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारनं आपल्या तिसऱ्या कार्यकाळाच्या सुरुवातीच्या १०० दिवसात प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातंर्गत सुमारे ३ हजार ४८ कोटी रुपयांचं कर्ज वितरित केलं आहे. केंद्रीय सुक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग मंत्री जितन राम मांजी यांनी आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. या कार्यक्रमातंर्गत २६ हजारापेक्षा जास्त सुक्ष्म उद्योग सुरु झाले असून सुमारे २ लाख १० हजार रोजगार संधी निर्माण झाल्या, असं ते म्हणाले.

गेल्या १०० दिवसात सरकारनं ९ पायाभूत सुविधा प्रकल्प मंजूर केले. त्यामुळे ११ कोटी मनुष्यदिवस इतकी रोजगारनिर्मिती होणार असल्याचं केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविय यांनी सांगितलं. केंद्रीकृत निवृत्तीवेतन, व्यवस्थेअतंर्गत येत्या १ जानेवारीपासून निवृत्त कर्माचाऱ्यांना त्यांच्या जवळच्या बँकेतून निवृत्ती वेतन मिळणार असल्याचं त्यांनी नमूद केलं.

गेल्या ९ वर्षात देशातल्या दूधउत्पादनात ५७ टक्क्यापेक्षा जास्त वाढ झाली असल्याचं, केंद्रीय मत्सोउद्योग, पशुपालन आणि दुग्धउत्पादन मंत्री राजीव रंजन सिंग यांनी सांगितलं. मत्स्य उत्पादनातही चांगली वाढ झाली असून त्याबाबत भारत दुसऱ्या स्थानावर आहे, असं ते म्हणाले. २०१३-१४ मधे देशातलं मत्सउत्पादन ९५ लाख टनापेक्षा जास्त होतं. ते २०२२-२३ मधे १ कोटी ७५ लाख टनाच्या वर गेलं. ही वाढ ८३ टक्के आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७४व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. मोदी यांनी त्यांच्या कार्यातून देशाची समृद्धी आणि प्रतिष्ठा उंचावली आहे. त्यांना निरोगी आणि आनंदी दीर्घायुष्याच्या शुभेच्छा, असं राष्ट्रपती मुर्मू आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हणाल्या आहेत. तर मोदी यांनी प्रधानमंत्री पदाच्या कार्यकाळात भारताला विकासाच्या मार्गावर नेलं असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्र्यांनी अथक परिश्रम, चिकाटी आणि दूरदृष्टीनं नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणत देशाला जगात नवी प्रतिष्ठा मिळवून दिल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत हा पॅरिस कराराअंतर्गत निर्देशांकातले टप्पे वेळेआधीच गाठणाऱ्या मोजक्या देशांपैकी एक असल्याचं केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी म्हटलं आहे. ते आज सीआयआय - आयटीसीच्या शाश्वतता विषयक १९व्या शिखर परिषदेत बोलत होते. शाश्वत पर्यावरणासाठी केंद्र सरकार अनेक उपाययोजना राबवत आहे, त्याअंतर्गत पुनर्वापर आणि पुनर्निर्मित वापरावर भर दिला जात आहे, यामुळे शाश्वत जीवनशैलीचा मार्ग प्रशस्त होईल, असं ते म्हणाले. प्रत्येकाला सन्मानानं जगण्याचा अधिकार असून, शाश्वतता हा त्यातला मुख्य घटक असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात आज ठिकठिकाणी ढोल ताशांच्या गजरात मिरवणुका काढत गणेशमूर्तींचं विसर्जन सुरू आहे. **मुंबईत** लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी सकाळपासून विसर्जन मिरवणुका काढण्यात येत आहेत. प्रसिद्ध मंडळांच्या महाकाय मूर्ती मिरवणुकीने निघाल्या आहेत. विसर्जन सोहळ्यासाठी मुंबई महापालिकेचे सुमारे १२ हजार अधिकारी - कर्मचारी विसर्जन

स्थळांवर तैनात आहेत. **गिरगाव, दादर, जुहू** इत्यादी समुद्रकिनाऱ्यांसह ६९ नैसर्गिक स्थळांसह एकूण २०४ कृत्रिम विसर्जनस्थळांवर विसर्जन सुरू आहे.

**पुण्यातही** मोठ्या संख्येनं भाविक गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले आहेत. संध्याकाळपर्यंत अनेक मानाच्या गणपतींचं विसर्जन झालं होतं.

**धुळे** जिल्ह्यात गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीत ट्रॅक्टरखाली चिरडल्यानं तीन मुलांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत सहा जण जखमी झाले असून त्यांना भाऊसाहेब हिरे शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

श्रोते, देशविदेशात कशारीतीने गणपती साजरे केले जातात हे आपण ऐकत आहोत. अमेरिकेत विविध राज्यात विविध ठिकाणी भारतीय नागरिक मोठ्या संख्येनं गणेशोत्सव साजरा करतात. न्यू जर्सीमधल्या गणेशोत्सवाला लाखो नागरिक भेट देतात. या मालिकेतल्या या शेवटच्या वृत्तामध्ये वॉशिंग्टनमधल्या गणेशोत्सवाची माहिती आपल्याला देत आहेत निशांत बिंदू…

**होल्ड - अमेरिका निशांत बिंदू**

**<><><><><>**

आतिशी या दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री असतील, असं आम आदमी पार्टीनं जाहीर केलं आहे. आमदारांच्या बैठकीत पक्षाच्या विधिमंडळ नेतेपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. त्याआधी अरविंद केजरीवाल यांनी नायब राज्यपाल व्ही के सक्सेना यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सोपवला. पुढच्या विधानसभा निवडणुकीपर्यंत आतिशी मुख्यमंत्रीपदी राहतील, हा निर्णय एकमताने घेतल्याचं दिल्ली सरकारमधले मंत्री गोपाल राय यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान उद्या होणार आहे. ९० अपक्षांसह एकूण २१९ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत आहेत. सात जिल्ह्यांमधल्या मिळून २४ विधानसभा मतदारसंघांमधे मतदान होणार असून त्यात जम्मूतले ४ तर काश्मीर खोऱ्यातले १६ मतदारसंघ आहेत. ऑगस्ट २०१९ मधे कलम ३७० रद्द झाल्यानंतर जम्मू काश्मीर केंद्रशासित प्रदेश घोषित झाला आणि त्यानंतर प्रथमच तिथं विधानसभेसाठी निवडणूक होत आहे. निवडणुकीच्या दृष्टीनं जम्मू काश्मीर पोलीस आणि प्रशासन सज्ज असून अधिकाधिक मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा याकरता सर्वत्र सुरक्षाव्यवस्था कडक करण्यात आली आहे. केंद्रीय निमलष्करी दलाच्या तुकड्याही तैनात आहेत. या टप्प्यातल्या निवडणुकीसाठी २३ लाख २७ हजार ५८० मतदार पात्र आहेत.

**<><><><><>**

कोलकात्याचे नवे पोलिस आयुक्त म्हणून मनोज कुमार वर्मा यांची नियुक्ती झाली आहे. सध्याचे आय़ुक्त विनीतकुमार गोयल यांची बदली पश्चिम बंगाल पोलिसांच्या विशेष कृतीदलाच्या अतिरिक्त पोलिस महासंचालक पदी केली आहे. तर, कोलकात्याचे उपायुक्त अभिषेक गुप्ता यांची बदली ईस्टन फ्रंटियर रायफल्सच्या कमांडट पदी झाली आहे. कोलकाता, महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्याप्रकरणानंतर त्यांना हटवण्याची मागणी केली जात होती.

**<><><><><>**

चीनमध्ये पार पडलेल्या आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत, आज झालेल्या अंतिम सामन्यात भारतानं चीनवर १-० असा विजय मिळवत जेतेपदाला गवसणी घातली. भारताचं हे विक्रमी पाचवं आशियाई विजेतेपद ठरलं आहे.

सामन्याची पहिली तीनही सत्र गोलशून्य बरोबरीत राहिली. त्यानंतर चौथ्या सत्रात भारताचा जुगराज सिंग यानं ५१व्या मिनिटाला सामन्यातला एकमेव आणि निर्णायक गोल करत भारताला विजय मिळवून दिला.

या सामन्यात चीननं भारताला चांगली लढत दिली मात्र, भारताचा गोलरक्षक क्रिषन पाठक आणि सुरक्षा फळीनं, चीनला यश मिळू दिलं नाही.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २१ ते २३ तारखेदरम्यान अमेरिकेचा दौरा करणार आहेत. २१ तारखेला ते विलमिंग्टनमध्ये आयोजित चौथ्या क्वाड परिषदेत सहभागी होतील. २३ तारखेला अमेरिकेच्या जनरल असेंब्ली भविष्य काळाबाबतच्या शिखर परिषदेत त्यांचं भाषण होणार आहे. या शिखरपरिषदेदरम्यान विविध जागतिक नेत्यांशी त्यांच्या द्विपक्षीय बैठका होणार आहेत.

//<><><><><>//